महाराष्ट्र शासन

गृह विभाग

अपर पोलीस महासंचालक व कारागृह महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे

फोन क्र : (०२०) २६१२७९०६ Website : www.mahaprisons.gov.in

# महाराष्ट्र कारागृह व सुधारसेवा वार्तापत्र

**माहे जानेवारी-२०२२**

## सारांश

- महाबँक ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन
- कायदे विषयक मार्गदर्शन शिबीराचे आयोजन
- नेत्र तपासणी शिबीराचे आयोजन व चष्मे वाटप कार्यक्रम

## संपादकीय संदेश



**श्री. अतुलचंद्र कुलकर्णी भा.पो.से.**
अपर पोलीस महासंचालक व कारागृह महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे -१

गुन्हेगारात सुधारणा करणे, पुनर्वसनासाठी कौशल्ययुक्त प्रशिक्षण देणे व बंदयांचे पुनर्वसन करणे ही कारागृह विभागाचे मुख्य उद्दीष्ट आहेत. या दृष्टीने कारागृह विभागाकडुन सातत्याने प्रयत्न होत आहेत. अग्रणी बँकेमार्फत राष्ट्रीय ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण योजनातर्गत बंदयाना विविध स्वयंरोजगार प्रशिक्षण देण्याचे काम कारागृहांमार्फत राबविण्यात येत आहे ही अतिशय आनंदाची गोष्ट आहे. ज्यायोगे ख-या अर्थाने बंदयास स्वयंपुर्ण होण्यास मदत होणार आहे. बेरोजगारी हे देखील गुन्हेगारीचे एक प्रमुख कारण आहे. कारागृहात मिळणारे हे स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण बंदयाचे पुनर्वसनासाठी उपयुक्त ठरणार आहे. ज्यायोगे बंदी पुन्हा गुन्हेगारी न वळता आपल्या स्वत:च्या पायावर सक्षमपणे उभा राहु शकणार आहे.

नवनवीन तंत्रज्ञानाबरोबर चालणे ही काळाची गरज आहे. आज सगळीकडे खरेदी विक्री करीता इलेक्ट्रॉनिक माध्यमाचा वापर होत आहे. त्या अनुषंगाने कारागृह विक्रीकेद्रांवर देखील युनिफाईड पेंमेट इंट रफेसच्या (UPI) माध्यमातुन विक्री रक्कमा स्विकारण्यात येत आहेत. यामुळे कारागृह वस्तु विक्री सुलभ झाली आहे.

१ सप्टेंबर १९६९ रोजी महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री मा. वंसतराव नाईक यांनी कारागृह विभागास ध्वज अर्पण केला होता त्या दिनाचे प्रित्यर्थ १ सप्टेंबर हा दिवस कारागृह ध्वजदिन म्हणुन साजरा करावयाचा निर्णय घेण्यात आला आहे या दिवशी ध्वज रोहण पालन करावयाच्या बाबींबाबतचे परिपत्रक देखील सर्व कारागृहांना निर्गमित करण्यात आले आहे.

करोनाच्या साथीचा अजुन प्रादुर्भाव संपलेला नाही तरी सर्व बदंयाचे, आपले व आपल्या परिवाराचे संपुर्ण लसीकरण करुन घ्यावे व कोवीड नियमांचे कटाक्षाने पालन करावे.



महाराष्ट्र शासन

गृह विभाग

## अपर पोलीस महासंचालक व कारागृह महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे

# येरवडा मध्यवर्ती कारागृह

### महाबँक ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन

मा. श्री. अतुलचंद्र कुलकर्णी, अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे संकल्पनेतुन व मा. श्री.योगेश देसाई, कारागृह उपमहानिरीक्षक, पश्चिम विभाग, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली महाबँक ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत बँक ऑफ महाराष्ट्र, पुणे व कारागृह विभाग यांचे संयुक्त विद्यमाने येरवडा मध्यवर्ती कारागृह येथील नजीकच्या काळात लवकर मुक्त होणा-या बंद्यांसाठी कारागृह विभागात येरवडा मध्यवर्ती कारागृह येथे प्रथमच नाविण्यपूर्ण अशा प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले. सदरच्या प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्‌घाटन दि.७.१२.२०२१ रोजी मा.श्री अतुलचंद्र कुलकर्णी, अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा,महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे शुभहस्ते व मा. श्री योगेश देसाई, कारागृह उपमहानिरीक्षक, पश्चिम विभाग, पुणे, श्री.विजयकुमार, कार्यकारी संचालक, बँक ऑफ महाराष्ट्र, श्री. विवेक धवन, अंचल प्रमुख, बँक ऑफ महाराष्ट्र, पुणे, श्री. सुनिल ढमाळ, प्र. कारागृह उपमहानिरीक्षक, मुख्यालय, पुणे, श्रीमती राणी भोसले, अधीक्षक, येरवडा मध्यवर्ती करागृह, पुणे, श्री. पी.जे. जगताप, उप अधीक्षक, कारागृह मुख्यालय, पुणे, श्रीमती पल्लवी कदम, उपअधीक्षक, येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे यांचे प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

मा.अतुलचंद्र कुलकर्णी यांनी बंद्यांना संबोधीत करताना सांगीतले की, कारागृहातुन लवकर मुक्त होणा-या बंद्यांनी या प्रशिक्षणाचा निश्चितच लाभ घ्यावा. बंदीवानांनी जीवनातील हा अध्याय संपवून नवीन अध्याय सुरू करण्याची ही वेळ आहे व म्हणूनच स्वयं अध्ययनाच्या दृष्टीकोणातुन बंद्यांसाठी हा उपक्रम सुरू करण्यात आला. बदनामीचा शिक्का पुसून आत्मनिर्भर होवून स्वावलंबन व स्वयंरोजगाराचं प्रशिक्षण घ्यावे व समाजात ताठ मानेनं उभं रहावं.

या प्रशिक्षण कार्यक्रमा अंतर्गत बंद्यांना कुक्कुट पालन, शेळी पालन, पापड,लोणचे, मसाला तयार करणे इत्यादी वेगवेगळे व्यावसायीक प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्याचाच एक भाग म्हणून दि.७.१२.२०२१ ते १६.१२.२१ पर्यंत १० दिवस नजीकच्या कालावधीत मुक्त होणा-या पुरूष बंद्यांसाठी कुक्कुट पालन प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. नामवंत प्रशिक्षकांकडून बंद्यांना प्रशिक्षीत करण्यात आले. या मध्ये कुक्कुट पालनाविषयी सर्वंकष मार्गदर्शन, उद्योजकता विकास, सेवा व सुविधा या विषयी मार्गदर्शन करण्यात आले. सदरच्या कुक्कुट पालन प्रशिक्षणाचा येरवडा कारागृहातील १४ बंद्यांनी लाभ घेतला. दि.१६.१२.२०२१ रोजी १० दिवसांच्या प्रशिक्षणावर आधारीत बंद्यांची लेखी व तोंडी परीक्षा घेतली परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या बंद्यांना कारागृहाचे श्री. शिवशंकर पाटील, उपअधीक्षक, येरवडा मध्यवर्ती कारागृह श्रीमती प्रिया खेरडेकर, श्री.पाटील, प्रशिक्षक, बँक ऑफ महाराष्ट्र यांचे हस्ते बंद्यांना व्यवसाय प्रशिक्षणाचे प्रमाणपत्र वाटप करून प्रशिक्षणाची सांगता करण्यात आली. सदरच्या प्रशिक्षणासाठी श्री.संजय मांढरे, संचालक श्री.संजय डगळे, समन्वयक, ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था, बँक ऑफ महाराष्ट्र, पुणे, श्री. जी.के.सरोदे, श्री. एस.यु.म्हस्के वरिष्ठ तुरूगाधिकारी, श्रीमती रजनी मोटके, शिक्षिका, श्री. कृष्णा पाडवी, श्री. संदिप दिघे यांनी सदर प्रशिक्षणाचे यशस्वी आयोजन केले.



महाराष्ट्र शासन

गृह विभाग

**अपर पोलीस महासंचालक व कारागृह महानिरीक्षक,**
**कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे**

## नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह

कायदे विषयक मार्गदर्शन शिबीराचे आयोजन



दिनांक १०.१२.२०२१ रोजी नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह येथे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नाशिक यांचे वतीने कायदे विषयक मार्गदर्शन शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमात चिफ कौन्सील लिगल ॲड. श्री. एफ.ए. शेख व ॲड. श्री. प्रसाद पवार यांनी बंद्यांना जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांचेकडुन पुरविण्यात येणा-या सुविधा विषयी माहिती दिली. सदर कार्यकमाचे आयोजन कारागृह अधीक्षक श्री. प्रमोद वाघ, वरिष्ठ तुरुंगाधिकारी श्री.अशोक कारकर यांचे मार्गदर्शनाखाली श्री. संदिप सरपाते मंडल तुरुंगाधिकारी यांचे उपस्थितीत करण्यात आले होते.

## नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह

नेत्र तपासणी शिबीराचे आयोजन व चष्मे वाटप कार्यक्रम

दि.१४.१२.२०२१ रोजी नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह येथे समता फाऊंडेशन मुंबई यांचे विद्यमाने कारागृहातील बंद्यांसाठी नेत्र तपासणी शिबीराचे आयोजन करुन बंद्यांकरिता चष्मे वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अधीक्षक श्री. प्रमोद वाघ, वरिष्ठ तुरुंगाधिकारी श्री. अशोक कारकर यांचे मार्गदर्शनाखाली मंडल तुरुंगाधिकारी श्री. वैभव आत्रम, श्री. ज्ञानेश्वर पाटील तसेच समता फाऊंडेशन समन्वयक श्री. प्रल्हाद भरसट यांचे उपस्थितीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमात १०० बंद्यांना चष्मे वाटप करण्यात आले.




## नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह

संगणक प्रशिक्षणाचे आयोजन



नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहातील बंद्यांना संगणकाचे ज्ञान प्राप्त होऊन कारागृहातुन मुक्त झाल्यावर त्यांचे पुनर्वसन व्हावे तसेच रोजगाराचे साधन उपलब्ध व्हावे याकरीता नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहात समता फाऊंडेशन मुंबई यांचे विद्यमाने ३० बंदी क्षमतेचे संगणक प्रशिक्षण कक्ष स्थापन करण्यात आले असुन याव्दारे माहे सप्टेंबर २०१९ पासुन बंद्यांना संगणकाचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. परंतु कोरोना संक्रमण कालावधीत सदर प्रशिक्षण बंद करण्यात आले होते. माहे डिसेंबर २०२१ पासुन नियमीत वर्ग सुरु करण्यात आले असुन सद्यस्थितीत ४७ बंदी नियमीत प्रशिक्षण घेत आहेत. कारागृह अधीक्षक श्री. प्रमोद वाघ, वरिष्ठ तुरुंगाधिकारी श्री. अशोक कारकर यांचे मार्गदर्शनाखाली सदरील संगणक प्रशिक्षण वर्ग सुरु करण्यात आले आहेत.

## नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह



नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहात बँक ऑफ महाराट्र नाशिक यांच्या सहकार्याने दिनांक ०४.०१.२०२२ ते दिनांक १३.०१.२०२२ या कालावधीत २४ बंद्यांकरिता फास्ट फुड प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते.सदर प्रशिक्षण हे रोजगार व स्वयंरोजगार कार्यालय, नाशिक येथील प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनानुसार घेण्यात आले.

## ठाणे मध्यवर्ती कारागृह



ठाणे मध्यवर्ती कारागृह येथे ठाणे जिल्हयातील बँक ऑफ महाराष्ट्र संस्थेच्या ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था,ठाणे व बँक ऑफ महाराष्ट्र,ठाणे यांचे संयुक्त विद्यमाने दि.१२.०१.२०२२ ते दि.२१.०१.२०२२ या कालावधीत फास्ट-फूड प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात आले. प्रशिक्षणामध्ये १२ शिक्षा बंदी व १९ न्यायाधीन बंदी असे एकुण ३१ बंद्यांनी सहभाग घेतला होता.सदर प्रशिक्षण पुर्ण केल्यानंतर संस्थेकडून प्रात्यक्षिक व लेखी परीक्षेचे आयोजन करुन सहभागी बंद्यांना मान्यवरांचे हस्ते प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले बद्दल प्रमाण पत्राचे वाटप करण्यात आले. तसेच बँक ऑफ महाराष्ट्र व ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थेचे पदाधिकारी यांनी सदर प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करणा-या बंद्यांना कारागृहातून मुक्त झालेनंतर स्वःताचा व्यवसाय सुरु करण्यासाठी कर्ज देणेबाबत आश्वासित केले.

दिनांक १२.०१.२०२२ रोजी ठाणे मध्यवर्ती कारागृहात बँक ऑफ महाराष्ट्र ठाणे यांच्या वतीने ग्रामीण रोजगार प्रशिक्षण संस्थेमार्फत कारागृहातील २५ बंद्यांना अन्न प्रक्रिया उदयोग प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करून त्याचे उद्घाटन करण्यात आले होते. सदर शिबीराप्रसंगी बँक ऑफ महाराष्ट्र चे पदाधिकारी व कारागृहातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमामुळे बंद्यामध्ये समाधानाची भावना दिसुन आली.







## नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह

### भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन



नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहात दिनांक ०६.१२.२०२१ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त कारागृह अधीक्षक श्री. प्रमोद वाघ यांचे हस्ते प्रतिमा पुजन करण्यात येवुन अभिवादन करण्यात आले. यावेळी वरिष्ठ तुरुंगाधिकारी श्री. अशोक कारकर, तुरुंगाधिकारी श्री. ज्ञानेश्वर पाटील, श्री. काशिनाथ केंगले यांचेसह सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यकमाचे नियोजन शिक्षक श्री. हेमंत पोतदार यांनी केले.

### साने गुरुजी जयंती

नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहात दिनांक २४.१२.२०२१ रोजी साने गुरुजी जयंती निमित्त अधीक्षक श्री.प्रमोद वाघ यांचे हस्ते साने गुरूजींच्या प्रतिमेचे पुजन करण्यात येवुन अभिवादन करण्यात आले. यावेळी वरिष्ठ तुरुंगाधिकारी श्री.अशोक कारकर यांचेसह सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहात साने गुरुजींनी कारावास भोगला असुन या काळात त्यांनी श्यामची आई पुस्तकाचे लेखन केले असल्याने या कारागृहास ऐतिहासिक महत्व प्राप्त झालेले आहे.



## कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह

### ख्रिसमस निमित्त वस्तुंचे प्रदर्शन व विक्री मेळाव्याचे आयोजन

कोल्हापूर मध्यवर्ती कारागृहात ख्रिसमस निमित्त बंदयांनी तयार केलेल्या कारागृह निर्मित वस्तुंचे प्रदर्शन व विक्री मेळाव्याचे आयोजन दिनांक १९.१२.२०२१ रोजी करण्यात आले. सदर मेळाव्याचे उद्घाटन जिल्हाधिकारी मा.श्री. राहुल रेखावार यांचे शुभहस्ते संपन्न झाले सदर कार्यक्रमास कारागृहातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.







## अहमदनगर जिल्हा कारागृह

### एचआयव्ही प्रतिबंधात्मक उपाययोजना



अहमदनगर जिल्हा कारागृहातील सर्व बंद्यांसाठी तसेच अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी जिल्हा शासकीय रुग्णालय अहमदनगर येथील एचआयव्ही विभाग यांच्या सहयोगातून दि.११ डिसेंबर २०२१ रोजी एचआयव्ही प्रतिबंधात्मक उपाययोजना घ्यावयाची काळजी उपलब्ध उपचार पद्धती याच बरोबर एचआयव्ही बाधित व्यक्ती सोबत कसा व्यवहार करावा, समज व गैरसमज कारागृहातील बंद्यांच्या बाबतीत शंका व त्यांचे निरसन, पांढरी कवीळ व गुप्तरोग या संबंधीतील रक्तनमुने तपासणी करण्यात आली. गुप्तरोगाबाबताचे समुपदेशन वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. विक्रम पानसंबाळ व जिल्हा कार्यक्रम अधिकारी शिवाजी जाधव यांनी केले. यावेळी कारागृह अधीक्षक शामकांत शेडगे, तुरुंगाधिकारी श्रीमती देवका बेडवाल व कर्मचारी उपस्थित होते.

## सोलापूर जिल्हा कारागृह

### बंद्यांचे समुपदेशनाचे कार्यक्रम

दिनांक ८.१२.२०२१ रोजी मा. पोलीस आयुक्त श्री हरीश बैजल, सोलापूर शहर यांनी सोलापूर जिल्हा कारागृह येथे भेट देऊन पाहणी केली. त्यावेळी त्यांनी बंद्यांचे समुपदेशनाचे कार्यक्रम घेण्याबाबत व शिवणकाम चे प्रशिक्षण देण्याबाबत चर्चा केली.




## मुंबई मध्यवर्ती कारागृह

### नेत्ररोग तपासणी शिबिर

दिनांक १० डिसेंबर २०२१ रोजी मुंबई मध्यवर्ती कारागृह येथे समता फौंडेशन यांच्यामार्फत बंद्यांसाठी नेत्ररोग तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. सदर शिबिरामध्ये ९८ बंद्यांनी व ११ कर्मचा-यांनी नेत्र चिकित्सा शिबिराचा फायदा घेतला आहे. तसेच आवश्यकता असणारे बंद्याना समता फाउंडेशन यांच्याकडून चष्मा वाटप करण्यात येणार आहे.

मुंबई मध्यवर्ती कारागृहामधील बंद्यांच्या दातांवर उपचार करण्यासाठी प्रोजेक्ट मुंबई या संस्थेच्या सहकार्याने दिनांक २८.१२.२०२१ व दिनांक २९.१२.२०२१ रोजी दंतचिकीत्सा व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबीरामध्ये नायर हॉस्पीटल, मुंबई येथून दंत चिकीत्सक व्हॅनसह एकूण १३ वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी कारागृहामध्ये उपचाराकरीता आले होते.

सदर शिबीरामध्ये दिनांक २८.१२.२०२१ रोजी एकूण २३८ व दिनांक २९.१२.२०२१ रोजी २०३ बंद्यांच्या दाताच्या आजाराचे स्क्रिनिंग करण्यात येवून औषधोपचार करण्यात आलेले आहेत.

## नागपूर मध्यवर्ती कारागृह

### त्वचारोग शिबीर

नागपूर मध्यवर्ती कारागृह येथे दिनांक १३.१२.२०२१ रोजी समता फाऊंडेशन यांचे वतीने त्वचारोग शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबीरात १६३ न्यायाधिन बंदी व ०८ शिक्षाधिन अशा एकुण १७१ बंदयांची तपासणी करून औषधोपचार करण्यात आले.

## नांदेड जिल्हा कारागृह

### अभागिणी (कविता)

श्रीरामाच्या राज्यात घेतलेत जन्म काही रावणासारखे
अधर्मी, ढोंगी साधु ही छत्रपती शिवरायांच्या हिंदवी
स्वराज्यात घेतलेत जन्म काही औरंगजेबा सारखे छळणारे
कुकर्मी,अविचारी राक्षस ही कोकीळेच्या वनात लपुन
बसलेत काही गिधाड ही अन निर्मळ पवित्र नदीच्या
काठावर टपुन बसले आहेत पांढरे शुभ्र वस्त्रधारी
काळयाकुट्ट मनाचे काही बगळे ही

दुष्ट मन,बुध्दी अनं नजर त्यांची जशी दुधारी विषारी
तलवार पाहतात इकडे-तिकडे, खिडकी दारात अनं
गल्ली-बोळात ही ठेवतात नजर एकटीवर
घरात,रानात,वनात अनं बुरसटलेल्या मनात ही करण्यास
मोहाचे अविचारी वार तिच्या तनावर अनं मनावर ही
अनं तुटुन पडतात लचके तोडायला, तोंड मारायला
चोंच मारुन अमानवी मन भरायला अनं तिला जीवे
मारायला ही ही जात गिधाडांची, ही जात गिधाडांची

पानांनी,फुलांनी,फळांनी सजलेल्या हिरव्यागार सृष्टीत ही
करतात चक्क लाल तिला तिच्याच रक्ताच्या थारोळयात
ही सुर्य, चंद्र, तारे आणि घरातील लख्ख प्रकाशात ही
करतात तिचे जीवन अंधकारमय,काळेकुट्ट अनं निष्ठुर ही
घात होतो तिचा आईच्या पोटात अनं जनावरांच्या
गोठयात ही घेतला जातो उपभोग तिचा वस्तु म्हणुन
बाहुली सम स्वत:च्या समाजमान्य पतीकडुन तर कधी
कुकर्मी राक्षसाकडुन ही
अरे राक्षसांनो, अरे नराधमांनो
अरे बुरसटलेल्या विचारांच्या ढोंगी पुरुषांनो
पुरुषरुपी वेषातील मनाच्या नपुसकांनो
मारलात तिला जिवंतपणीच
कधी सतिच्या नावाने
तर कधी गर्भातच स्त्री भ्रुण हत्याच्या नावाने
कधी निर्भया तर कधी अनामिका
कधी कल्पना गीरी कधी सुरेखा राठोड च्या नावाने ही

आता वेळ आली आहे स्वत:ला अरवण्याची अनं
सावरण्याची
नाही तर घेईल ती जन्म बनुन दुर्गा अनं काली माता ही
घेईल हाती तलवार,त्रिशुल अनं चक्र ही
ललकारी देईल ज्वालारुपी वाणी अनं ओकेल राग
क्रोध ही कापेल तुमचा गळा अनं फाडेल पोट ही
काढेल काळेकुट्ट रक्त अनं शरीरातील प्राण ही
देईल तिला स्वातंत्र अनं करेल मुक्त तुमच्या बंधनातुन
ही, बंधनातुन ही

न्यायाधीन बंदी क्र.२८ विजय टोपा राठोड
नांदेड जिल्हा कारागृह

मा. अपर पोलीस महासंचालक व कारागृह महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे-१
यांचे मान्यतेने अंतर्गत वापरासाठी प्रकाशित.
निर्मिती:- डॉ.श्री.हेमंत पवार,संशोधन अधिकारी, सहनिर्मिती:- श्री.एस.आर.पाटील, तुरुंगाधिकारी श्रेणी-२,श्री.डी.पी. निरफळ,मुख्याध्यापक,
अपर पोलीस महासंचालनालय व कारागृह महानिरीक्षणालय, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे-१